# मालेगाव महानगरपालिका,मालेगाव

## आरोग्य अधिकारी कार्यालय

☎(०२५५४) २३०४७५, २३१८०१, २३१९५०


रा.आ.अभि.जा.क्रं. ५७५ /२५ दिनांक:- १७/११/२०२५

प्रति.

मा.आयुक्त सो.

आरोग्य सेवा व संचालक,

राष्ट्रीय आरोग्य अभियान,मुंबई

विषय:-राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अन्वंये MBBS/BAMS कंत्राटी पदाची जाहीरात वेबसाईटवर प्रसिध्द करणे बाबत.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अन्वंये MBBS/BAMS कंत्राटी पदाची जाहीरात तयार करणेत आलेली आहे. सदर यादी वेबसाईटवर प्रसिध्द करणेकरीता सोबत जोडुन पाठविण्यात येत आहे.

सदर NUHM अंतर्गत MBBS/BAMS कंत्राटी पदाची जाहीरात कार्यालयीन वेब साईटवर दि.३०/०५/२०२५ रोजी प्रसिध्द करावी ही विनंती.

(डॉ.जयश्री आहेर)
प्र.आरोग्य अधिकारी
मालेगाव महानगरपालिका,मालेगाव

प्रत माहितीस्तव सविनय सादर.

१) मा.उपसंचालक,आरोग्य सेवा,परीमंडळ नाशिक

# मालेगाव महानगरपालिका,मालेगाव
# एकात्मिक आरोग्य व कुंटुब कल्याण सोसायटी,मालेगाव
# आरोग्य अधिकारी कार्यालय

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत 15 वा वित्त आयोग व हिंदुसम्राट श्री बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्यासाठी मालेगाव महानगरपालिका, मालेगाव कार्यक्षेत्रासाठी भरती प्रक्रिया कंत्राटी व करार पध्दतीने मानधन तत्तावर खालील पदांसाठी पात्र उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहे.

| Sr.No | Name Of Post | No.of Post & Applicable Reservation | Educational Qualification | Age Criteria | Remuneration In per Month |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Full Time Medical Officer | **10**<br>ST-7<br>NTD-1<br>SBC-1<br>OPEN-1 | MBBS From Institute Recognized By Medical Council of India | Maximum Age limit up to 70 years. After attending age of 60 candidate has to Provide fitness certificate issued by Civil Surgeon. | Rs.60000/- |
| | | | BAMS From Institute Recognized By Maharashtra Medical Council Of India | for Reserved category age limit up to 43 years as on for open candidate age limit up to 38 years as on (candidate working in NHM age relaxation up to 5 years) | Rs.25000/- Fixed Salary & Rs.15000/- Performance Incentive |

सदर पदे मालेगाव महानगरपालिका,मालेगाव अंतर्गत कार्यान्वीत करण्यात येणा-या आयुष्यमान आरोग्य मंदीर केंद्र व आपला दवाखाना करीता अटी व शर्ती:-

1) 15 वा वित्त आयोग अंतर्गत आयुष्यामन आरोग्य् मंदीर केंद्राकरीता वैदयकीय अधिकारी MBBS पदवीधाराकांच्या नियुक्तीला प्राधान्य देण्यासाठी केंद्र शासनाने सुचविले आहे.त्यानुसार आयुष्यमान आरोग्य मंदीर केंद्रातील वैदयकीय अधिकारी पदाकरीता MBBS पदवीधारकांची नियुक्ती करणेकरीता प्राधान्य देण्यात येईल.परंतु अनेक प्रयत्न करुनही MBBS पदवीधारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास 15 वा वित्त आयोग अंतर्गत आयुष्यमान आरोग्य मंदीर केंद्राकरीता वैदयकीय अधिकारी म्हणुन MBBS पदवीधारक उमेदवार उपलब्ध होईपर्यत अथवा 6 महिन्याकरीता BAMS पदवीधारक उमेदवारास वैदयकीय अधिकारी म्हणुन तात्पुरत्य स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल.

2) उपरोक्त पदे हा कंत्राटी अत्यंत तात्परुत्या स्वरुपाची असुन नियुक्ती 11 महिने 29 दिवस कालवधी किंवा माहे 30 जुन 2026 अखेर राहील. व शासनाने सदर पदे नामंजुर केल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता उमेदवारांची सेवा संपुष्टात येईल.

3) जाहीरातील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाने सेवा नियम लागु नाही तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेते सामवुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यांसबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

4) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया समक्ष असावा तसेच अर्जदारविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

5) उपरोक्त कंत्राटी पदांकरीता दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल.

6) सेवानिवृत्त विशेषतज्ञ/कर्मचारी यांचे निवड झालेस सदर पदांकरीता मानधन राज्य स्तरावरुन प्राप्त विहोत मार्गदर्शक सुचनांनुसार मोजमाप करुन अदा करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

7) जाहीरातील रिक्त पदांच्या संख्येत बदल होऊ शकतो तसेच रिक्त ठिकाणामध्ये बदल होऊ शकतो यबाबतचे सर्व अधिकारी मा.आयुक्त तथा प्रशासक सो मालेगाव महानगरपालिका,मालेगाव यांनी राखुन ठेवले आहेत.

8) अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकास प्राधान्य दिले जाईल.

9) एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करावयाचा असल्यास उमेदवारांनी प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र अर्ज सादर करावेत.

10) एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करताना अर्जासेबत पदाचा प्राधान्यक्रम कार्यलयास सादर करावा.

11) निवड यादीतील गुणक्रमांकाचे आधारे प्राधान्यक्रमाने पदस्थापना दिली जाईल.त्याबाबत उमेदवारांना कुठल्याहरी दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराचो निवड रद्द करण्यात येईल.

12) जाहीरातीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी 38 वर्षे व मागासवर्षे 43 वर्षे राहील.NHM मध्ये कार्यरत असल्यास वयोमर्यादा ही 5 वर्षे शिथील राहील.वैदयकीय अधिकारी(MBBS)यांची सेवा प्रवेश आणि सेवा समाप्तीची वयोमर्यादा 70 वर्षे राहील.60 वर्षावरील अर्जदारांकरीता जिल्हा शल्य चिकीत्सक प्रमाणति शारीरीक योग्यता(Physical Fitness)चे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे वय वर्षे60 नंतर प्रत्येक वर्षी जिल्हा शल्य चिकीत्सक यांचेकडुन शारीरीकदृष्या समक्ष असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतरच नियुक्ती आदेश देण्यात येईल.

13) शासकीय,निमशासकीय तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असणा-या अनुभवाचाच विचार निवड प्रक्रियेत करण्यात येईल.

14) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत सोईनुसार ठिकाण बदलवुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

15) उपरोक्त पदापैकी तांत्रिक पदाकरीता **वैदयकीय अधिकारी** MBBS/BAMS पदाकरीता तत्सम कौन्सीलचे रजीष्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकरता राहील.अन्यथा उमेदवारांस मुलाखतीत अपात्र ठरविले जाईल.

16) भरती प्रक्रिया स्थगीत करणे/रदद करणे/पदभरती प्रक्रियेस बदल करण्याचे सर्व अधिकार मा.आयुक्त तथा प्रशासक सो मामनपा यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत.याबाबत कोणालाही दावा करता येणार नाही.

17) उमेदवारांने विहीत नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रतिसह आपले अर्ज राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग, जुने आयुक्त कार्यालय, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव येथे दि.18/11/2025 ते दि.24/11/2025 रोजी सायंकाळी 05.00 वाजता शासकीय सुटीचे दिवस वगळुन व्यक्तीश सादर करावेत.

18) खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रु.150/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी रु.100/-चा डिमांड ड्राफ्ट **Intergrated Health & Family Welfare Society Malegaon** या नावे देय असावा.

19) सदरहु भरती प्रक्रियेकरीता अर्ज दि. 24/11/2025 अखेर राहणार असुन तदनंतर छाननी,लेखी परीक्षा/मुलाखत प्रक्रिया,निवड यादी प्रसिध्द करणे, हरकती/आक्षेप प्राप्त करुन घेणे व त्या निकाली काढणे आदी रितसर शासनाच्या तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानाकडील प्राप्त मार्गदर्शक सुचनांनुसार भरतीप्रकिया पार पाडुन निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देणे इत्यादी बाबत सविस्तर तपशिल वेळोवेळी mahaarogya.gov.in मालेगाव महानगरपालिका, मालेगाव http://www.malegaoncorporation.org या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेत येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी सदर विषयी कार्यालयात विचारणा करण्यासाठी येऊ नये.

20) सदर पदभरती प्रकियेचे संपुर्ण अधिकार पदे कमी किवा जास्त करणे,भरती प्रक्रिया रद करणे,अटी व शर्ती मध्ये बदल करणे, पदस्थापना ठिकाणमध्ये बदल करणे,निवड प्रक्रिया कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार तसेच इत्यादी प्रकारचे सर्व अधिकारी मा.आयुक्त तथा प्रशासक सो यांनी राखुन ठेवला आहे.

21) सदर निवड प्रक्रिया पुर्ण झालेनंतर भविष्यात जर एखादया ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिलेमुळे जागा रिक्त झालेस प्रतिक्षा यादीवरील उमेदवारास नवीन भरती प्रक्रिया न करता नियुक्ती आदेश दिले जातील.

22) अर्जाचा नमुना हा जाहीरातीसोबत प्रसिध्द निकाल जाहीर करण्यात आलेला असुन सदरील नमुन्याप्रमाणे अर्ज नसल्यास उमेदवारांचा अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही.

23) उमेदवारांचा अर्ज अपुर्ण व अर्धवट भरलेला असल्याने नाकारला गेल्यास सर्वस्वी जबाबदारी ही उमेदवारांची राहील याबाबत उमेदवारांना तक्रार करता येणार नाही.

24) MBBS उमेदवारांचे मुलाखत घेऊन निवड करणेत येत येईल.

25) BAMS पदाची निवड शैक्षणिक अर्हता व उच्च शिक्षण व कामाच्या अनुभवानुसार अंतिम निवड करणेत येईल याची नोंद घ्यावी. BAMS उमेदवारांची मुलाखत घेण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

26) BAMS वैदयकीय अधिकारी पदांकरीता निवड प्रक्रिया ही प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार अर्जाची छाननी करुन गुणानुक्रमे यादी तयार करण्यात येऊन त्यामध्ये शैक्षणिक पात्रतेचे 50% गुण उच्च शिक्षितचे 20 (1)PGअसल्यास -20/20, 2)Diploma असल्यास-20/10) व शासकीय/निम शासकीय अनुभवासाठी जास्तीत जास्त 30 असे एकुण 100 गुणांनुसार उमेदवाराची अंतिम निवड करण्यात येईल.

27) निवड झालेल्या वैदयकीय अधिकारी यांना आरोग्यवर्धीनी केंद्र व हिंदुसम्राट श्री बाळासाहेब ठाकेर आपला दवाखाना येथे नियुक्ती देण्यात येईल.

खालीलप्रमाणे आवश्यक असलेल्या मुळ कागदपत्राच्या साक्षाकिंत केलेल्या प्रती अर्जाच्या नमुन्याला जोडाव्यात.
1)शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका 2)जातीचे प्रमाणपत्र 3)शाळा सोडल्याचा/जन्मतारीख दाखला 4)पासपोर्ट आकाराचे 2 फोटो 5)शासकीय अनुभव असलेले प्रमाणित केलेले अनुभव प्रमाणपत्र 6)लहान कुंटुबाचे प्रमाणपत्र 7)पोलीस कार्यालयाचा चारीत्रय पडताळणी प्रमाणपत्र दाखला इत्यादी आवश्यक आहे.

आयुक्त तथा प्रशासक
अध्यक्ष निवड समिती
मालेगाव महानगरपालिका,मालेगाव